

बळवंत ढगे

धुतलेल्या नॅपकिन्सच्या घड्या घालताना महिला कर्मचारीवर्ग.

सक्सेस स्टोरी

# वृक्षसंहाराला रचनात्मक पर्याय...




सुधीर जोगळेकर
sumajo51@gmail.com


नाशिकच्या तपोवनातील वृक्षतोड हा सध्या महाराष्ट्रात सर्वाधिक चर्चिला जाणारा विषय बनला आहे. आगामी कुंभमेळ्याच्या पूर्वतयारीसाठी ही परदेशी आणि पर्यावरणविरोधी वृक्षांची तोड केली जाते आहे, अशी भूमिका शासकीय यंत्रणा घेत आहे, तर देशी असोत वा परदेशी कोणत्याही प्रकारची झाडे तोडली जाऊ नयेत, अशी भूमिका पर्यावरणवादी घेत आहेत. मात्र, मूळ मुद्दा खरे तर हा आहे किंवा असायला हवा, की परदेशी वृक्षांचीदेखील तोड होता कामा नये, धोरण असेलच तर ते परदेशी वृक्षांची लागवड होऊ नये, असे असायला हवे. वृक्षतोडीने पर्यावरणाची हानी होतेच. परंतु, त्यापासून बनवले जाणारे टिश्यू पेपर किंवा पेपर नॅपकिन्स कचऱ्याचे प्रमाण वाढवतात आणि पर्यावरणालाही हानी पोचवतात. **वर्ध्याच्या बळवंत ढगे** नामक तरुणाने ही हानी, हा धोका लक्षात घेऊन त्यावर आपल्या परीने खादी नॅपकिनचा पर्याय शोधून काढला आहे आणि तो रेस्टॉरंटमध्ये लोकप्रियही होतो आहे. त्या रचनात्मक पर्यायाची ही यशोगाथा...

ऑक्टोबरच्या मध्यावर केव्हा तरी 'श्रीधा ग्रीन सोल्यूशन्स' नावाच्या एका कधीही नाव न ऐकलेल्या कंपनीची पूर्ण पानभर जाहिरात एका वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली. ती जाहिरात नव्हती, हे त्या मजकुरावर कोपऱ्यात लिहिलेल्या ॲडव्होटोरिअल (advertotial) या शब्दावरूनच स्पष्ट होत होते; पण तरीही त्या विषयीची उत्कंठा मनात होतीच. पत्ता आणि फोन नंबर कोथरूडचा होता, त्यावरून संपर्क केला आणि भेट ठरली. संपर्क केल्याचे बळवंत ढगे यांना आश्चर्य वाटले; पण दोघांची जातकुळी एकच निघाली, तेही व्यावसायिक पत्रकार होते; पण पत्रकारिता बाजूला ठेवून आता व्यवसायात उतरले होते आणि स्वतःची स्टार्ट-अप कंपनी त्यांनी सुरू केली होती आणि 'श्रीधा' हे त्या कंपनीचेच नाव होते.

## वर्धा ते मुंबई वाटचाल

बळवंत ढगे मूळचे वर्ध्याचे, विदर्भातील. ढगे यांचा परिवार गांधीवादी संस्कारात वाढलेला, त्यांचे वडील संपूर्णपणे गांधीवादी विचारांचे. सेंद्रिय शेतीची चळवळ विदर्भात आणि विशेषतः विदर्भात रुजवण्यात मोठा सहभाग राहिला, मुलांनी नोकऱ्या मागणारे न बनता नोकऱ्या देणारे बनावं, असा आग्रह त्यांनी मुलांपुढे धरला आणि मुलेही त्याच मार्गाने जाऊ लागली. बळवंत जरा वेगळी वाट चोखाळेल की काय असं त्यांना वाटलं असावं, कारण बळवंतनं शिक्षणाच्या निमित्तानं मुंबईची वाट धरली आणि मुंबई विद्यापीठातून त्यानं मास मीडिया विषयातील पदवी प्राप्त केली. काही काळ त्यानं एका इंग्रजी वृत्तपत्रात नोकरीही केली. परंतु, शिक्षणाची ओढ स्वास्थ्य बसू देत नव्हती. बळवंतनं ॲडव्हर्टायझिंग आणि मार्केटिंग विषयात एमबीए पूर्ण केलं आणि तो वर्ध्याला परतला.

### पुण्यातील रेस्टॉरंटचा उत्स्फूर्त प्रतिसाद

काही महिन्यांतच सुमारे शंभर रेस्टॉरंटची ऑर्डर मिळाली. शिवाजीनगरमधील 'वर्ल्ड ऑफ व्हेज' हे त्यातलंच एक. त्याचे पर्चेस हेड विशाल तावरे आणि एरंडवण्यातील 'अभिषेक व्हेज'चे मालक प्रतीक शेट्टी या दोघांनीही 'श्रीधा'च्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केलं. दोघंही सहा महिन्यांपासून 'श्रीधा'चे खादी रुमाल वापरत आहेत. आमचं कचऱ्याचं प्रमाण तर कमी झालंच; परंतु, पेपर नॅपकिनच्या जागी आमच्या रेस्टॉरंटचं नाव असलेले रुमाल वापरायला सुरुवात केल्यानं डायनिंग टेबलचं सौंदर्य खुललं. ग्राहकांनाही ते पसंत पडलं, असं त्यांनी सांगितलं.

## 'श्रीधा'ची पायाभरणी

'श्रीधा'चा जन्म वर्ध्यात परतल्यानंतर झाला. त्याला निमित्त बनलं त्यांचं साधं रेस्टॉरंटमध्ये जाणं. पेपर नॅपकिनचा होणारा बेसुमार वापर आणि त्यातून निर्माण होणारा कचरा अस्वस्थ करत होता. वर्ध्यासारख्या शहरातील रेस्टॉरंटची ही स्थिती असेल, तर पुण्या-मुंबईसारख्या शहरात रोजचा पेपर नॅपकिनचा केवढा कचरा होत असेल, याचा नुसता विचार त्यांच्या मनात आला आणि ते अस्वस्थ झाले. पुण्यासारख्या मध्यम आकाराच्या शहरात हजारो रेस्टॉरंट असतील, त्यांना लागणाऱ्या रोजच्या पेपर नॅपकिनचा



'एसक्यूब'साठी बनवलेले नॅपकिन्स



'शेफ टच'साठी बनवलेले नॅपकिन्स


हॉटेल 'ग्रीन सिग्नल'साठी बनवलेले नॅपकिन्स




**विविधरंगी नॅपकिन्स एकाच वेळी मशिनद्वारे धुतले जाताना...**

अंदाज बांधला, तरी वर्षाला त्यांच्या निर्मितीसाठी किमान दीड लाख झाडं तोडावी लागतील, हे त्यांच्या लक्षात आलं आणि ते विचारात पडले. या पेपर नॅपकिनऐवजी खादीच्या कापडापासून बनवलेले रुमाल वापरले, तर वृक्षतोडही होणार नाही आणि खादीचे रुमाल तयार करण्याच्या निमित्ताने अनेक लोकांना रोजगार मिळेल, पाच हजार कापूस उत्पादकांना त्याचा अप्रत्यक्ष लाभ होईल आणि भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचं प्रतीक मानल्या गेलेल्या खादीला पुन्हा एकदा उर्जितावस्था येईल, असा विचार त्यांच्या मनात आला आणि त्याचवेळी दुसऱ्या कुणीतरी हे कशाला करायचं, आपणच का करू नये या विचारानं त्यांना पछाडलं आणि पत्रकारिता, ॲडव्हर्टायझिंगचं ग्लॅमरस क्षेत्र सोडून ते रुमाल निर्मितीच्या, पर्यायानं खादी प्रसाराच्या आणि वृक्षतोडीला सकारात्मक पर्याय देण्याच्या क्षेत्राकडे वळले. यातील सर्वांत अवघड गोष्ट होती ती रेस्टॉरंट मालकांना पटविण्याची. वापरलेले, खराब झालेले पेपर नॅपकिन कचऱ्यात टाकले की ते मोकळे होत होते, याउलट खादीचे रुमाल वापरायचे तर ते टाकता येणारे नव्हते, टाकले तर परवडण्याची शक्यताही नव्हती. ते रुमाल रोज धुऊन स्वच्छ करून वापरायचे, तर त्यासाठी आणखी खर्च होणार होता, मनुष्यबळ लागणार होतं. त्यासाठी रेस्टॉरंट मालक तयार व्हायची शक्यता नव्हती. बळवंत ढगे यांनी त्यावर मार्ग काढला, त्यांनी रेस्टॉरंट मालकांना सुचवलं, तुम्ही रुमाल वापरा, खराब झाले की माझ्याकडे देण्यासाठी बाजूला काढून ठेवा, माझी माणसं रोजच्या रोज वापरलेले गोळा करतील, फॅक्टरीत घेऊन येतील, स्वच्छ धुतील, इस्त्री करून तुम्हाला परत देतील. तुम्ही ते पुन्हा नव्यासारखे वापरू शकाल.

## पुण्यात व्यवसायाचा जम

एमआयटी टेक्नॉलॉजी बिझनेस इनक्युबेटरनं बळवंत ढगे यांना पुरेसं मार्गदर्शन केलं आणि खादीशी असणारं वडिलांपासूनचं नातं आणखी गहिरं होणार याची मनोमन खूणगाठ त्यांना पटली. खादीच्या किरकोळ विक्री व्यवसायात ते भावांबरोबर होतेच, किंबहुना त्यासाठीच २०१९ मध्ये त्यांना नॅशनल आंत्रप्रुनरशिप पुरस्कारदेखील मिळालेला होता. त्याचा अनुभव त्यांच्या कामी येणारच होता. तसंच घडलं. खरं तर, बदल कोणालाही नको असतो, वर्षानुवर्षांची अंगी लागलेली सवय मोडायला, बदलायला सहसा कुणी तयार होत नसतं. बळवंत यांनाही तो अनुभव येत होता, अखेरीस मार्च २०२४ मध्ये कोंडी फुटली, पुण्यातील रेस्टॉरंटची पहिली ऑर्डर ढगे यांना मिळाली आणि मग 'खुल जा सिम सिम' झालं. कोथरूड भागात ग्रँडस्टँड ट्रिनिटीच्या मागे ढगे यांचे युनिट आहे, वर्ध्यातून बनवून घेतलेले खादी नॅपकिन्स तिथे कस्टमाइझ केले जातात, वापरून झालेले धुतले जातात, त्याला इस्त्री केली जाते आणि ते पुन्हा पॅक करून ग्राहकांकडे पोहोचवले जातात.

बळवंत यांनी ग्राहकाची गरज, अपेक्षा ध्यानात घेतली आणि त्या त्या रेस्टॉरंटचं नाव लिहिलेले, इस्त्री केलेले खादी रुमाल त्यांच्या त्यांच्या ठिकाणी पोहोचविण्याची व्यवस्था लावून घेतली. बळवंत यांच्या खादी नॅपकिननं कचरा कमी होतो आहे, खादीचा प्रचार-प्रसार होतो आहे, विशिष्ट रंग आणि नाव घातलेल्या नॅपकिनमुळे पर्सनल टच येतो आहे, स्वदेशी भावना जपली जाते आहे, भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा वारसा जपला जातो आहे, ग्रामीण रोजगाराला उत्तेजन मिळते आहे. पुण्यात पसरू लागलेले खादी नॅपकिनचे लोण हळूहळू राज्यभर आणि देशभर पसरेल, याची खात्री बळवंत ढगे यांना वाटते आहे. त्यांच्या खादी श्रद्धेला आणि पर्यावरण संवर्धनाच्या प्रयत्नांना शुभेच्छा!

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार-संपादक आहेत.**
**९८२००१६६७४)**